पुढारी



नाशिक : के. के. वाघ संस्थेत रोटेटिंग मशीनरी बूट कॅम्पप्रसंगी तज्ज्ञ मार्गदर्शक.

# वाघ महाविद्यालयात रोटेटिंग मशीनरी बूट कॅम्प

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

एफएसआयडीच्या समृद्धी कौशल्य निर्मिती उपक्रमाचा एक भाग म्हणून, के. के. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग एज्युकेशन अ‍ॅण्ड रिसर्च संस्थेत कॉम्प्रेसर आणि पंप्सवरील चार दिवसांचा रोटेटिंग मशीनरी बूट कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. अवजड उद्योग मंत्रालयाच्या पाठिंब्याने, या कार्यक्रमाचे उद्दिष्ट पदवीधर अभियंत्यांना रोटेटिंग मशीनरीच्या व्यावहारिक, उद्योग-संबंधित कौशल्याने सुसज्ज करणे आहे.

बूट कॅम्पमध्ये फिरणाऱ्या उपकरणांच्या डिझाइन, कार्यप्रणाली आणि निदानाची सखोल माहिती दिली जाते. संदर्भात एफएसआयडीचे प्रॉडक्ट ॲक्सिलरेशनचे संचालक योगेश पंडित यांनी माहिती दिली. मॉडेलिकॉन इन्फोटेक एलएलपीच्या अनुभवी व्यावसायिकांनी आयोजित केलेल्या या सत्रात मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी विभागातील १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी भाग घेतला. योगेश पंडित यांनी उद्घाटन केले. के. के. वाघ इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. के. एन. नांदूरकर यांनी विद्यार्थी-केंद्रित नवोपक्रमांना पाठिंबा देण्याच्या संस्थेच्या वचनबद्धतेची पुष्टी केली. या कार्यक्रमासाठी मॅकेनिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख डॉ. पी. बी. कुशारे, प्रा. आर. व्ही. भंडारे आणि प्रा. ए. डी. भगुरे यांनी परिश्रम घेतले.

Nashik Edition

Aug 02, 2025 Page No. 05

Powered by: erelego.com